


## प्राधिकरणाचा 'विकास' कधी?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसांपूर्वी 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'सह राज्यातील अन्य प्राधिकरणांची आढावा बैठक झाली. स्थापना होऊन बराच काळ उलटला असला तरी छत्रपती संभाजीनगरच्या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला म्हणावे तसे बळ सरकारने दिलेले नाही. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिकसह मोठ्या शहरांतील प्रकल्पांना बळ दिले जाते. मात्र राजकीय उदासीनतेमुळे छत्रपती संभाजीनगरसह प्राधिकरणातील ३१३ गावे, झालर क्षेत्रातील २८ गावांचा नियोजनबद्ध विकास महापालिका, सिडको, एमआयडीसी, म्हाडा, झालर क्षेत्र आदी वेगवेगळ्या पाच प्राधिकरणांच्या कात्रीत अडकला आहे.

छत्रपती संभाजीनगरसाठीच्या प्राधिकरणाची चर्चा २०१६ पासूनच सुरू झाली. १ मार्च २०१७ रोजी आजच्या 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'ची स्थापना झाली. प्रशासकीय, विकासात्मक आणि नियोजनात्मक अशा तीन पद्धतीनुसार विकासकामांना अधिक गती येईल असे सांगण्यात आले. परंतु, आजही हे प्राधिकरण पूर्ण क्षमतेने सुरू नाही.

राज्यात मुंबईसाठी एमएमआरडीए, पुण्यासाठी पीएमआरडीए, तर नागपूरसाठी एनएमआरडीए अशी प्राधिकरणे आली. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापले तरी त्याकडे दुर्लक्ष केल्यागत स्थिती आहे. ३० नोव्हेंबर २०१८रोजी प्राधिकरणाच्या कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात ४९ पदे निश्चित करण्यात आलेली होती. प्राधिकरणाचे एकूणच विस्तारीत कामकाज विचारात घेता सुमारे दीडशे पदांच्या सुधारित आकृतीबंधास १३ सप्टेंबर २०२४ रोजी मान्यता देण्यात आली. परंतु, ना पुरेसे अधिकारी, ना कर्मचारी ना निश्चित अशी जागा अशी स्थिती आहे.

प्राधिकरण ही मोठी शहरे व त्याच्या आसपासच्या उपनगरांचा नियोजित आणि सर्वांगीण विकास करणारी विशेष नियोजन संस्था समजली जाते. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा विकास आदी कामे प्राधिकरणाकडून अधिक वेगाने होतील अशी भाबडी आशा सर्वसामान्यांना आजही आहे. परंतु, राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे 'छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'ला म्हणावे तसे बळ मिळत नाही. प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, गंगापूर, वैजापूर, पैठण तालुक्यांतील एकूण ३१३ गावांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे प्राधिकरणाकडे या गावांच्या नियोजनात्मक पायाभूत विकासाची जबाबदारी आली. विकास परवानगी, अनधिकृत बांधकाम प्रतिबंध व निर्मूलन आदी कामकाजही प्राधिकरणाकडे येते. परंतु, प्राधिकरणच सक्षम नसेल तर विकास काय, असा प्रश्न उपस्थित होतोच. यासोबतच अनधिकृत बांधकामांना आळा, विकास परवानगी अशा कामांसाठीही अडचणी येत असतात असा अनुभव प्राधिकरणातील गावांच्या धुरिणांना येतोच.

आज शहरात महापालिका, सिडको, एमआयडीसी, म्हाडा यांच्यासह झालर क्षेत्र अशा छोट्या-मोठ्या प्राधिकरणांची हद्द येते. इतकी प्राधिकरणे असल्याने हद्दीचा वादही अनेकदा दिसतो. त्यात झालर क्षेत्रात २८ गावे आहेत. या गावांचाही नियोजनबद्ध विकास याच कात्रीत अडकला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक विकासामुळे रोजगाराच्या शोधात इतर जिल्ह्यांसह परराज्यातील हजारो नागरिक छत्रपती संभाजीनगरमध्ये स्थलांतरीत झाले. विस्ताराच्या तुलनेत, वाढत्या शहरीकरणाच्या तुलनेत शहरातील पायाभूत सुविधांचा म्हणावा तसा विस्तार, विकास झालेला नाही. नागरी सुविधांवरील ताण वाढतो आहे. पायाभूत सुविधांसह पाणी पुरवठ्याचा प्रश्नही भेडसावतो. अशा वेळी प्राधिकरणामुळे विकासाला काही गती येईल, अशी आशा निर्माण झाली. परंतु, तसे आजपर्यंत तरी झालेले दिसत नाही. महानगर प्रदेश प्राधिकरणाचा विकास कधी होणार? विकासाची प्रतीक्षा कधी संपणार?

**- मकरंद कुलकर्णी**

# अध्यात्म आणि संस्कृती यांची जगाला शास्त्रीय भाषेत ओळख करून देणारे 'डॉ. जयंत आठवले'

एकेकाळी आंतरराष्ट्रीय संमोहन उपचारतज्ञ म्हणून जगभर ख्याती असलेले मात्र प्रॅक्टिस करताना आधुनिक वैद्यकीय शास्त्राच्या मर्यादा लक्षात आल्याने अध्यात्माकडे वळणारे, संतांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः साधना करून समाजाला शास्त्रीय भाषेत अध्यात्म सांगणारे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८४ वा जन्मोत्सव नुकताच पार पडला. यानिमित्ताने त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती करून घेऊया.

जागतिक कीर्तीचे संमोहन उपचार तज्ञ म्हणून ख्याती मिळवलेले डॉ. आठवले यांनी १५ वर्षे संमोहन-उपचारतज्ञ म्हणून संशोधन केल्यावर काही रुग्ण नेहमीच्या औषधोपचारांनी बरे होत नाहीत पण तीर्थक्षेत्री किंवा संतांकडे गेल्यामुळे वा धार्मिक विधी केल्यामुळे बरे होतात, असे त्यांच्या लक्षात आले. यामुळे 'अध्यात्मशास्त्र' हे उच्च प्रतीचे शास्त्र आहे, हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी जिज्ञासू वृत्तीने अध्यात्मशास्त्राचा सखोल अभ्यास केला, अनेक संतांकडे जाऊन शंकानिरसन करून घेतले आणि स्वतः साधना केली. १९८७ साली इंदूर येथील थोर संत प.पू. भक्तराज महाराज यांनी त्यांना गुरुमंत्र दिला. अध्यात्माचा प्रसार गावोगावी करण्यासाठी १९९९ साली त्यांनी सनातन संस्थेची स्थापना केली. आज लाखो साधक सनातन संस्थेच्या मार्गदर्शनाखाली अध्यात्मिक साधना करत आहेत, तर अनेक हिंदुत्वनिष्ठ संस्था आणि संघटना सनातनच्या आध्यात्मिक कार्याशी जोडल्या गेल्या आहेत. गुरूंनी सांगितलेली धर्मप्रसार आदी सेवा पुष्कळ अडथळे येऊनही आज्ञापालन म्हणून ते करत आहेत. प्राणशक्ती अत्यल्प असूनही गुरूंनी ग्रंथलिखाणासाठी दिलेल्या आशीर्वादाप्रमाणे, दिवसातील बहुतांश वेळ ते ग्रंथ लिखाणाचे कार्य गुरूंची सेवा म्हणून करत असतात. संतांसमोर शिष्यभावात वावरणे, जिज्ञासू वृत्ती, आध्यात्मिक संशोधन करणे, व्यक्तीगत जीवन विरक्त भावाने जगणे, वेळेचा विनियोग करणे, प्रीती, काटकसर, इतरांचा विचार करणे, समाजातील घटनांकडे संवेदनशीलतेने पहाणे ही त्यांची काही वैशिष्ट्ये आहेत.

अध्यात्म हे सुद्धा एका प्रगत आणि प्रगल्भ शास्त्र आहे हे ओळखून डॉ. आठवले यांनी प्रवचने, व्याख्याने, सत्संग, अभ्यासवर्ग यांतून अध्यात्म वैज्ञानिक पण सहज आणि सुलभ भाषेत सांगायला सुरुवात केली. अध्यात्मातील सिद्धांत आगळ्या पद्धतीने उलगडल्यामुळे अनेक डॉक्टर, अभियंते, वकील, शास्त्रज्ञ, पत्रकार यांसारखा सुशिक्षित वर्गही त्यावेळी डॉ. आठवले यांच्या अभ्यासवर्गांना उपस्थित राहू लागला. अध्यात्म हे कृतीचे शास्त्र असून अध्यात्मात तात्त्विक ज्ञानाला २ टक्के तर प्रत्यक्ष कृतीला ९८ टक्के महत्व आहे आणि ही कृती म्हणजेच साधना. डॉ. आठवले यांच्या अभ्यासवर्गांना येणारा जिज्ञासू वर्ग नामजपादी साधना करू लागला. साधना केल्यावर अनुभूती येतात आणि अनुभूतींमुळे श्रद्धा वाढते आणि त्यातूनच भावनिर्मिती होऊन चराचरात भगवंताचा वास जाणवू लागतो. हा प्रवास शब्दात मांडणे सोपे असले, तरी कृतीमध्ये आणणे तितकेच अवघड आहे; मात्र ज्याने या प्रवासातील अडथळे पार करून साधनेतील विविध टप्पे ओलांडले त्याने अध्यात्मातील अद्वितीय आनंद चाखला आहे. डॉ. आठवले यांनी सांगितलेली गुरुकृपायोगानुसार साधना करून आज अनेक साधक अध्यात्मातील आनंद अनुभवत आहेत. स्वतःतील दोष नाहीसे करण्यासाठी आणि गुणांचे संवर्धन करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहेत. अहंनिमूलनासाठी सतर्कतेने प्रयत्न करत आहेत. जेव्हढे प्रयत्न अधिक तेव्हढा आनंदही अधिक याची अनुभूती सनातन संस्थेच्या मार्गदर्शनानुसार साधना करणारा प्रत्येक साधक आज घेत आहे. आपल्याला मिळणारा साधनेतील आनंद इतरांनाही मिळावा यासाठी सनातनचे अनेक साधक गावोगावी जाऊन अध्यात्माचा प्रसार करत आहेत, लोकांना साधना सांगत आहेत. दिव्याने दिवा पेटवून जसा सारा परिसर तेजोमय करता येतो तसे आपल्याला उमजलेली साधना इतरांना सांगून सनातनचे साधक समाजात अध्यात्माचा प्रकाश पसरवून अज्ञानाचा अंधकार दूर करत आहेत. डॉ. आठवले यांनी सनातन संस्थारुपी लावलेल्या बीजातून आज कल्पवृक्ष साकारला गेला आहे. या कल्पवृक्षाच्या फांद्या आज जगभर विखुरल्या आहेत. संपूर्ण भारतासह विदेशातही सनातनचे साधक डॉ. आठवले यांनी सांगितलेली साधना करून स्वतःचा अध्यात्मिक



उद्धार करून घेत आहेत.

दिवसागणिक समाजाच्या ढासळत्या नीतिमत्तेचे परिणाम आज सर्वत्र दिसत आहेत. खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण, दरोडे यांसारख्या गुन्ह्यांची संख्या गेल्या काही वर्षांत कमालीची वाढली आहे. ३ वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाची वृद्धाही वासनांधांच्या अत्याचारांना बळी पडत आहे. भारतासारख्या संस्कृतीप्रिय देशात आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनू लागला आहे. पोलीस, शिक्षक, नातेवाईक यांच्यापासूनही स्त्रीया सुरक्षित राहिलेल्या नाहीत. प्रत्येकाच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स आणि इंटरनेट यांचा उपयोग कमी आणि दुरुपयोग अधिक होऊ लागला आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत समाजात नैतिक मूल्ये रुजवण्याचे आणि त्यांचे संवर्धन करण्याचे महत्कार्य डॉ. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सनातन संस्थेचे साधक करत आहेत.

अन्य पंथीयांना त्यांच्या प्रार्थना स्थळांतून त्यांच्या पंथाविषयी धार्मिक शिक्षण मिळते. देशातील बहुसंख्य हिंदू समाजासाठी मात्र दुर्दैवाने अशी कोणतीच व्यवस्था आज नाही. अशा परिस्थितीत हिंदू संस्कृतीतील आचारधर्म, सण उत्सवांमागील धर्मशास्त्र आणि ते कसे साजरे करावेत याबाबतची माहिती, हिंदू देवी-देवतांविषयी अध्यात्मशास्त्रीय माहिती, हिंदू धर्मातील प्रथा परंपरांमागील शास्त्र, प्राचीन ऋषी मुनींनी अखिल मानवजातीसाठी दिलेले महत्वपूर्ण योगदान, देवतांचे अवतारकार्य, देवतांच्या उपासनांमागील शास्त्र, आदर्श आणि आरोग्यदायी दिनचर्या, ऋतुचर्या, इत्यादी अर्थपूर्ण माहिती सनातन संस्थेच्या सत्संगांतून आणि धर्मशिक्षण वर्गांतून सांगितली जाते. याबाबतचे सविस्तर ज्ञानभांडार संस्थेच्या संकेतस्थळाच्या आणि युट्युब चॅनलच्या माध्यमातून जगासमोर खुले केले आहे.

सनातन संस्थेच्या नियतकालिकांच्या रूपाने ते घरोघरी पोहोचवले जाते. देशात विविध ठिकाणी असणारे सनातन संस्थेचे आश्रम आदर्श जीवनशैलीचे दर्शन घडवणारी केंद्रे आहेत. सनातन संस्थेच्या साधकांसाठी ते साधनेला स्फूर्ती देणारे ऊर्जास्रोत आहेत. अध्यात्म इतके गहन आणि प्रगल्भ शास्त्र आहे कि त्यातील एकेका सूत्रावर अनेक खंड तयार व्हावेत. डॉ. आठवले यांना त्यांचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी दिलेल्या आशिर्वादानुसार त्यांनी आजमितीला ग्रंथलिखानाच्या सेवेत स्वतःला झोकून दिले आहे. डॉ. आठवले यांनी संकलित केलेले अध्यात्मातील विविध अंगांची माहिती करून देणारे शेकडो ग्रंथ सनातन संस्थेने आजवर विविध भाषेत प्रकाशित केले आहेत. भावी पिढीला दिशादर्शन करणारे आणखी शेकडो ग्रंथ डॉ. आठवले संकलित करत असून येणाऱ्या काळात तेसुद्धा प्रकाशित होणार आहेत. भारतीय संस्कृतीच्या उद्धारासाठी अहोरात्र झटणारे आणि समाजाला अध्यात्मिक साधनेला लावून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा वसा घेतलेले अद्वितीय व्यक्तिमत्व डॉ. जयंत आठवले हे अवतारी पुरुषच असल्याने अनेक संतांनी आणि अध्यात्मातील अधिकारी व्यक्तींनी जाहीर केले आहे. भारतीय संस्कृती आणि सभ्यता यांच्या जागतिक प्रसारासाठी केलेल्या अद्वितीय योगदानाविषयी सनातन संस्थेचे संस्थापक डॉ. जयंत आठवले यांना २०२४ साली 'संस्कृती युवा संस्थे'च्या वतीने 'भारत गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला फ्रान्सच्या संसदेत पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यात डॉ.आठवले यांच्या वतीने त्यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी बिंदा सिंगबाळ आणि अंजली गाडगीळ यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## शाई डाग

अंगावर फेकतात
कुणी तरी ती शाई
डाग पुसले जरीही
व्रणधुतला न जाई

खोलवर हो जखम
करुनजाती कसाई
जागवतोआठवणी
डागपडला कसाही

कशी घडली घटना
चर्चा चाले ठाईठाई
चघळतराही सगळे
चटपटीत ही खट्टाई

कमवले ते गमावले
ते चारित्र हनन होई
एकअदृश्य तलवार
कायम स्वरुपी डोई

खरोखर जोचुकला
बरोबर तया धुलाई
शिक्षा मार्ग कसाही
जरुरी असे कल्हाई

कधी निर्दोष असून
अंगलट येते भलाई
फाटून जाणार अब्रू
कितीहीकर शिलाई

मार झोड ना करता
मनाची होते पिटाई
सोसवेना टिकामार
सोडवा माई विठाई

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# एका राक्षसी कुशासनाचा अंत !

पश्चिम बंगालमधील निवडणुकांचे निकाल हे सगळ्यांनाच अचंबित करणारे आहेत. या निकालानुसार पश्चिम बंगालमध्ये आता ममता बॅनर्जींच्या तृणमूल कॉंग्रेस पक्षाचे पूर्णपणे अध:पतन झाले आहे. ममता बॅनर्जींच्या कार्याचा आढावा अगदी वरवर जरी घेतला तरी त्यांच्या राज्यात त्यांनी गुंडांना किती मोकळीक दिली होती, स्त्रियांवर कितीतरी भयानक अत्याचार झाले, खरेतर हेतूपूरसर केले गेले, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता गेल्या पंधरा वर्षात किती खालावली, तसेच व्यापारी वर्गाला तेथे व्यवसाय करणे किती कठीण करून ठेवले होते हे आपल्या सहज लक्षात येते. खरंतर त्याआधीचे साम्यवादी पक्षाचे सरकार हे सुद्धा तेथील जनतेला सुशासन देणारे नव्हते तरी त्यांच्या काळात किमान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा आणि सामाजिक जीवन काही प्रमाणात तरी सुसह्य होते. मात्र ममता बॅनर्जींच्या गेल्या पंधरा वर्षांच्या कारकिर्दीत सामान्य लोकांना आपले जीवन जगणे, व्यवसाय करणे, उत्तम शिक्षण घेऊन नोकरी मिळणे कितीतरी अशक्यप्राय करून ठेवले होते हेच तेथील लोकांच्या प्रतिक्रियांवरून लक्षात आले.

यासोबतच ममता बॅनर्जींनी केंद्र सरकारी सूचनांना पूर्णपणे धाब्यावर बसवले होते. उलट त्या पश्चिम बंगाल हा भारताचा भाग नसून एक स्वतंत्र भाग असल्याप्रमाणे वागत होत्या हे त्यांच्या गेल्या दहा वर्षातील कित्येक सरकारी धोरणातून लक्षात येतच आहे. खरंतर टीएमसी च्या कार्यकर्त्यांना बंगाली लोक 'कार्यकर्ते' न संबोधता 'गुंड' संबोधतात यातच सर्व काही स्पष्ट होतं. ममता बॅनर्जींच्या विरोधात जाणं, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, संविधान पालनाची मागणी करणे म्हणजे संपूर्ण परिवारासह त्या व्यक्तीच्या मृत्यूला उघड बोलावणे आहे हे तेथील जनतेला चांगलेच ठाऊक होते. त्यामुळे लोक भयापोटी गप्प होते. त्यांच्या कारकिर्दीत ज्यांना आपल्या राज्यात शांतता हवी आहे आणि सुशासन हवे आहे, सामान्य जीवन जगायचे आहे अशा शेकडो लोकांच्या हत्या त्यांनी घडवून आणल्याचे उघड आहे, तरीही हे थांबवणे कोणालाही शक्य झाले नाही. आता तरी तेथे स्थापन झालेल्या नवीन सरकारने ही परिस्थिती पूर्णपणे सुधारावी अशीच जनतेची अपेक्षा आहे. किंबहुना आर्थिक विकासाआधी तेथील गुंडगिरी थोपवणे हे मोठे आव्हान नवीन सरकार समोर आहे.

तेथील मुलांच्या शिक्षणाचा दर्जा सुधारला जावा, स्त्रियाच काय तर पुरुषांनाही सुरक्षित वातावरण प्राप्त व्हावे, व्यवसाय, उद्योगाची द्वारं खुली व्हावीत जेणेकरून नोकरीसाठी बाहेर जाणारा लोंढा थांबेल, त्याचप्रमाणे ममता बॅनर्जी आणि ढचउ च्या गुंडाच्या भीतीमुळे, दडपशाहीमुळे जे गुणवान तरुण राज्याबाहेर गेले आहेत, त्यांना तेथे पुन:स्थापित होता यावे अशीच सर्व भारतवासीयांची इच्छा आहे. अनेक रोहिंग्या बांगलादेशी घुसखोर करदात्या बंगाली जनतेची संसाधन फुकटात वापरून देशाचे जे प्रचंड आर्थिक नुकसान करत

आहेत त्यांना ताबडतोब बांगलादेश मध्ये हाकलून लावावे आणि भारत - बांगलादेश सीमा सुरक्षित करून घुसखोरीलाही तात्काळ आळा घातला जावा अशी देशावासियांची भावना आहे.

**- सौ स्वाती हरेर**

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन !

आज ११ मे, आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास महामंडळ (टी डी बी) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या. दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती. १९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक (कोडवर्ड) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनीखालुन प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणूचाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणूचाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या (सीएसआयआर) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज (एनएएल) ने विकसित केले होते. तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना (डीआरडीओ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेपणास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**- श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### गुलाम नबी आझाद गर्ल्स उर्दू हायस्कूलचा घवघवीत यश एसएससी परीक्षेत ९७ टक्के निकाल



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१०, जिंतूर (परभणी) :** जिल्ह्यातील जिंतूर शहरातून शैक्षणिक क्षेत्रातील अभिमानास्पद बातमी समोर आली असून गुलाम नबी आझाद गर्ल्स उर्दू हायस्कूल या विद्यालयाने एसएससी परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शहरातील उर्दू शाळांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ९७ टक्के लागला असून, विद्यार्थिनींची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले.विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये नाजिया फरहीन युनूस सय्यद हिने ७६.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच शेख माहेक शेख बशीर हिने ७६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर अफ्शीन खानम पठाण शेर खान हिने ७३.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. उर्दू शाळेच्या या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण जिंतूर शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. उर्दू भाषेकडे कमी होत चाललेला कल लक्षात घेता, अशा परिस्थितीत विद्यालयाने मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद मानले जात आहे.

विद्यालयाच्या यशाबद्दल शिक्षक, पालक आणि विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### 'ढोकेश्वर' च्या विद्यार्थ्यांची दहावीतील यशाची परंपरा कायम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या बोर्ड परिक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सन २०२५-२६ च्या दहावी परीक्षेत ढोकेश्वर विद्यालयाचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

कॉपीमुक्त तथा सरमिसळ आणि सीसीटीव्हीच्या निगराणीत, तणाव विरहित व भयमुक्त, शांततेच्या वातावरणामध्ये ढोकेश्वर विद्यालयाच्या सेमी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये कु. सृष्टी संतोष पवार हिने ९७.४० टक्के गुण घेऊन विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

विद्यालयातील १४३ पैकी १३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात विशेष योग्यतेत ५२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ४५, द्वितीय श्रेणीत ३३ विद्यार्थी, तृतीय श्रेणीत ६ विद्यार्थी अशाप्रकारे मोठ्या संख्येने उत्तीर्ण झाले आहेत. सात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. विद्यालयात प्रथम क्रमांक सृष्टी संतोष पवार (९७.४० टक्के), द्वितीय क्रमांक तन्वी मंगेश वाळुंज (९६ टक्के), आणि तृतीय क्रमांक श्लोका भानुदास अडसूळ (९५.८० टक्के) ,शेजल संदिप गायकवाड (९५.४० टक्के), चतुर्थ क्रमांक, तर समीक्षा नितीन खेडेकर ९४.४० हिने पाचवा क्रमांक मिळवला. १३ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शन शिक्षकांचे शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी व प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक मनिषा गाडगे तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### जुईनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व आर्थिक मदत कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१०, जुईनगर (नवी मुंबई) :** बहुजन समाज पार्टी तसेच माता रमाबाई आंबेडकर बुद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने बाबासाहेब सिताराम साळे यांनी स्वतःच्या संकल्पनेतून दान पारमिता तथागत यांचा अंगीकार करून समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विशेष गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम छोटे खणी, महालक्ष्मी सोसायटी, जुईनगर येथे उत्साहात संपन्न झाला.

यावेळी चौथी ते बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संबंधित विद्यार्थ्यांचे पालक रोजंदारीवर काम करणारे असून अनेकांचे स्वतःचे घर नसल्याने त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने गुणगौरवाबरोबरच आर्थिक मदतही करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात बौद्धाचार्य पोपट वाघमारे यांनी त्रिशरण पंचशील घेऊन केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद धुरंधर (अध्यक्ष, बेलापूर विधानसभा बसपा), बौद्धाचार्य, वृत्तरत्न पेपरचे पत्रकार कल्याणराव हणवते, झेंडे मॅडम, रवि साळुंखे (निवृत्त झडख), यशपाल धारा वाल्मिकी, आशा यशपाल, जमीर शेख, प्रवीण लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत तसेच महापुरुषांच्या प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानित विद्यार्थ्यांमध्ये तन्वी धुरंधर, श्रावणी धुरंधर, विश्वरत्न धुरंधर, प्रियांका यशपाल, दीपा यशपाल, मुकेश कुवरसिंग वाल्मिकी आणि मीना मुकेश कुवरसिंग यांचा समावेश होता. तसेच काही विद्यार्थ्यांचे पालक कदम, घाडगे, मारुती सरवदे आणि बद्रिके हेही उपस्थित होते. कार्यक्रमात शांताबाई धुरंधर, बाबासाहेब साळे, पोपट वाघमारे आणि रवि साळुंखे यांनी प्रबोधनपर गीत गायन सादर केले. शेवटी सर्वांनी सरणतय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विक्रम (बप्पा) मुंडे अध्यक्ष असलेल्या सर्वच विद्यालयांचे दहावी परिक्षेत प्रेरणादायी यश



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१०, बीड :** बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रामध्ये दबदबा असणारे बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे अध्यक्ष असलेल्या केज तालुक्यातील सर्वच विद्यालयांनी दहावी बोर्ड परिक्षेत प्रेरणादायी यश संपादन करत उज्ज्वल यशाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. यामध्ये विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील डॉ.विश्वनाथराव कराड विद्यालयचा एकूण निकाल ९८% तर श्री.विठ्ठल माध्यमिक विद्यालय सारणी (सांगवी) ता.केज या शाळेचा एकुण निकाल ९६% लागला आहे तर ४५ विद्यार्थी विषेश प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.तसेच श्री.बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज या शाळेचा एकुण निकाल १००% लागला आहे. तर रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित विश्वनाथराव दराडे निवासी विद्यालय वाघेबाभूळगाव ता.केज शाळेचा निकाल १००% लागला आहे.तसेच गजेराम मुंडे निवासी विद्यालय केळगाव ता.केज या शाळेचा एकुण निकाल १००% तर रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय पिंपळगाव ता.केज शाळेचा निकाल १००% लागला आहे.तर मिराबाई शिक्षण प्रसारक मंडळ माळेगांव संचलित बुवासाहेब पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेचा निकाल ९५.१२% तर श्री.रामकृष्ण महाराज विद्यालय विडा ता.केज या शाळेचा निकाल ९७.७७ % तर माळेगाव हायस्कूल माळेगांव ता.केज या शाळेने ९६.७० % निकाल लावत दहावी बोर्ड परिक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे.दरम्यान परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे, संस्थेचे अध्यक्ष विजयकांत (भैय्या) मुंडे, संस्थेचे सचिव अतुल (दादा) मुंडे, प्रा.माधुरीताई मुंडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील प्रा.डॉ. विश्वनाथराव कराड विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा एकुण निकाल ९८% लागला असून शाळेतून १) चि.कसबे सुरज विलास ८८.६०% गुण घेऊन (प्रथम) तर २) कु.गालफाडे योगिता सचिन ८६.६०% (दूतिय) ३) चि.घुगे चैतन्य विकास ७५% गुण घेऊन तृतिय क्रमांक पटकावला आहे.दरम्यान शाळेच्या मुख्याध्यापिका प्रा.माधूरीताई मुंडे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व उतिर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) कु.मुंडे प्रतिक्षा प्रदिप ९१.२०% (प्रथम) २) मुंडे जयेश बाबासाहेब ८५.६० % (दूतिय) तर ३) मुंडे सार्थक मच्छिंद्र ८०.२०% गुण मिळवत तृतिय क्रमांक मिळवला आहे. दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक संजय मुंडे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.विठ्ठल उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सां) ता.केज शाळेचा एकुण निकाल ९६% लागला असून शाळेतून १) कु.ऋतुजा धनराज केदार ९२.४० % गुण घेऊन (प्रथम) तर रमाकांत अंकुश केदार ९१.६०% (दूतिय) तर कु. ऋतुजा जगन्नाथ घोळवे ९१.२० % गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आहे. तसेच शाळेतील ४५ विद्यार्थि विषेश प्रविण्यासह उत्तीर्ण झाले असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक सचिन हांगे यांनी अभिनंदन केले आहे.

बुवासाहेब पाटील उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेचा एकुण निकाल ९५.१२ % लागला असून शाळेतून १) जगताप प्रशांत बापु ९०.६०% गुण घेऊन (प्रथम) तर २) मनसुखे अपेक्षा दशरथ ८६.४० % (दूतिय) तर ३) काळे कांचन सचिन ८४.४० % गुण घेऊन (तृतिय) क्रमांक पटकावला आहे.दरम्यान शाळेतून विशेष प्राविण्यांसह २० विद्यार्थी,प्रथम श्रेणीतून १० विद्यार्थी, दूतिय श्रेणी तून ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचे मुख्याध्यापक प्रा.सदाशिव मुंडे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय विडा ता.केज शाळेचा एकुण निकाल ९७.७७ % लागला असून शाळेतून १) आंधळे कार्तिक पांडुरंग ८७ % (प्रथम) २) पिंगळे वैभवी राजेंद्र ८६.८०% (दूतिय) तर पिंगळे पृथ्वीराज राजेंद्र ८६.४०% गुण घेऊन ( तृतिय) क्रमांक मिळवला आहे.दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक राम काटकर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

माळेगांव हायस्कूल माळेगांव ता.केज शाळेचा एकुण निकाल ९६.७० % लागला असून शाळेतून १ ) चाळक अक्षरा अशोक ८९.६०% (प्रथम) २) पवार वैशाली पद्माकर ८८.२०% (दूतिय) ३) अधर्म गितांजली शरद ८७.६० % गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आसून शाळेचे मुख्याध्यापक श्री.लोकरे सर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री विश्वनाथराव दराडे निवासी विद्यालय वाघेबाभूळगाव ता.केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) बोंदर प्राजक्ता संपत ७३.४०% (प्रथम) २) बारगजे प्रियंका विक्रम ६८.४०%(दूतिय) ३) धूमक अंजली बाळू ६६.८०% गूण मिळवत तृप्ति क्रमांक मिळवला आसून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

रामकृष्ण महाराज निवासी विद्यालय पिंपळगव्हाण ता .केज शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेतून १) कु.धुमाळ साक्षी मोहन ८९.८०% (प्रथम) २) धुमाळ संकेत मोहन ७८% (दूतिय) तर ३) भांगे अजिंक्य किशोर ७७.६०% गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आसून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## मंद्रूपच्या लोकसेवा प्रशालेतील विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेतील यशाची परंपरा

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१०, सोलापूर :** मंद्रूप येथील शिक्षण प्रसारक मंडळ मंद्रूप संचलित लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या बोर्ड परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सन २०२५-२६ च्या दहावी परीक्षेत प्रशालेचा निकाल ८९.०९ टक्के लागला आहे. कॉपीमुक्त तथा सरमिसळ आणि सीसीटीव्हीच्या निगराणीत, तणाव विरहित व भयमुक्त, शांततेच्या वातावरणामध्ये प्रशालेच्या सेमी माध्यमचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये अभिषेक सूर्यकांत मोगलाई याने ९२.२० टक्के गुण घेऊन प्रशालेत प्रथम तर वैष्णवी सुधाकर कोरे ही ८९.९० टक्के गुण घेऊन द्वितीय आणि विजयालक्ष्मी रविराज म्हेत्रे ही ८९.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविले आहे. त्याचप्रमाणे प्रशालेचा मराठी माध्यमचा निकाल ८२.१७ टक्के लागला असून प्रथम क्रमांक उदयराज भुताळसिद्ध गिरगाव ७६ टक्के तर द्वितीय क्रमांक ऋतुजा नागनाथ जोडमोटे ७२.८० टक्के आणि तृतीय क्रमांक जयश्री ज्योतिबा माने ७०.२० टक्के गुण मिळविले आहे.

दहावी परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष योग्यतेत २४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ३८ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ५- विद्यार्थी, तृतीय श्रेणीत २९ विद्यार्थी अशाप्रकारे मोठ्या संख्येने उत्तीर्ण झाले आहेत. ओंकार मळसिद्ध कोळी याने ३५% गुण मिळवून या प्रशालेतून उत्तीर्ण



झाला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सहसचिव तथा माजी युवा सरपंच आप्पासाहेब म्हेत्रे, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, भाजपा संघटक गौरीशंकर मेंडगुदले यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार शिवशरण पाटील, सचिव माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव माजी सरपंच पिरप्पा म्हेत्रे, सर्व संचालक प्राचार्य बसप्पा घाटे, उप मुख्याध्यापक मदगोंडा मलकारी, पर्यवेक्षक शिवपुत्र म्हेत्रे, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, श्री मल्लिकार्जुन वस्तीगृहाचे अधीक्षक व सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद तथा प्राध्यापक, प्राध्यापिका, आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## 'आपका शहर मीडिया' तर्फे सर्वपक्षीय टॉक शो संपन्न; शहरातील समस्यांवर खडाजंगी चर्चा

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा-भाईंदर :** 'आपका शहर मीडिया' चॅनेलच्या वतीने आज सायंकाळी ५ वाजता भाईंदर पश्चिम येथील रीना मेहता महाविद्यालयाच्या सभागृहात 'शहरातील समस्या व निदान' या विषयावर सर्वपक्षीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या टॉक शो मध्ये शहरातील प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि कायदेतज्ज्ञ सहभागी झाले होते. रस्ते, पाणी, वाहतूक कोंडी, फेरीवाला समस्या, शिक्षण, आरोग्य आणि वाढत्या गुन्हेगारीवर सविस्तर चर्चा झाली.

**उपस्थित मान्यवर व त्यांची मते :**

**१. भाजपा - डॉ. सुरेश येवले :** डबल इंजिन सरकारमुळे मेट्रो, उड्डाणपूल, पाणी योजनांना गती मिळाली. केंद्र व राज्यात एकाच विचाराचे सरकार असल्याने निधी कमी पडत नाही.

**२. काँग्रेस - राकेश राजपुरोहित :** शहरात विकासाच्या नावाखाली फक्त जाहिरातबाजी सुरू आहे. पावसाळ्यात रस्त्यांची चाळण होते, पाणीटंचाई कायम




आहे. सामान्य माणसाला दिलासा नाही.

**३. मनसे - रेश्मा तपासे :** मिरा-भाईंदरमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना डावलले जात आहे. फेरीवाला झोन, नोकऱ्यांमध्ये मराठी माणसाला प्राधान्य हवे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई झालीच पाहिजे.

**४. राष्ट्रवादी (शरद पवार गट) - श्याम रावत :** सत्ताधाऱ्यांचे नियोजनशून्य धोरणामुळे शहर बकाल होत आहे. आरोग्य यंत्रणा कोलमडली आहे. महापालिका रुग्णालयात डॉक्टरच नाहीत.

**५. शिवसेना (शिंदे गट) - दीप काकडे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मिरा-भाईंदरला मोठा निधी मिळाला. क्लस्टर योजना, रस्ते काँक्रीटीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. विरोधकांनी फक्त टीका करू नये.

**६. शिवसेना (उबाठा गट) दीपेश गावंड :** आमच्या काळात मंजूर झालेल्या योजनांचे श्रेय आताचे सरकार घेत आहे. गद्दारी करून सत्ता मिळवली, पण शहराचे प्रश्न सुटले नाहीत. खड्डेमुक्त रस्त्याचे आश्वासन हवेत विरले.

**पत्रकार व वकील संतोष मिश्रा यांची भूमिका :**

सर्व पक्षांनी एकमेकांवर आरोप करण्यापेक्षा शहरासाठी एकत्र येऊन 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' ठरवावा. RTO, पोलीस, महापालिका यांच्यात समन्वय नाही. सामान्य नागरिक भरडला जातो. न्यायालयात जाण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रशासनाने आधीच कारवाई करावी.

**नागरिकांचा सहभाग :**

सभागृहात उपस्थित नागरिकांनी वाहतूक कोंडी, अनधिकृत फेरीवाले, पाणी समस्या, महिला सुरक्षेचे प्रश्न मांडले. काही प्रश्नांवर नेत्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली, मात्र शेवटी 'शहरहितासाठी एकत्र काम करू' असे आश्वासन सर्वांनी दिले.

'आपका शहर मीडिया'च्या संपादकांनी सांगितले की, अशा प्रकारचे टॉक शो दर तीन महिन्यांनी घेतले जातील आणि दिलेल्या आश्वासनांचा 'फॉलो-अप' घेतला जाईल.

# पी.एम.श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळेचा १०० टक्के निकाल

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१०, चिमूर (चंद्रपूर) :** पी.एम. श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर यांनी यावर्षीच्या माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील सर्व विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्याने संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थिनींच्या या उज्ज्वल यशामुळे शाळेचे, पालकांचे तसेच परिसराचे नाव अभिमानाने उंचावले आहे.

यावर्षीच्या परीक्षेत कु. आरूषी दहीवले हिने ९०.४० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. कु. प्राजक्ता उंवरकर हिने ८७.६० टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान मिळविले तर कु. तेजस्वी रामटेके हिने ८०.६० टक्के गुण प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थिनींनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या, चिकाटीच्या आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य यामुळे विद्यार्थिनींना हे यश मिळविता आले. विद्यार्थिनींच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता खोब्रागडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थिनींनी अत्यंत कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे यश प्राप्त केले आहे. शाळेतील शिक्षकवृंदाने विद्यार्थिनींना नियमित मार्गदर्शन केले. भविष्यातही विद्यार्थिनींनी अशाच प्रकारे यश संपादन करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे.

शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल सहायक आयुक्त समाजकल्याण, चंद्रपूर विनोदजी मोहतुरे यांनी शाळेचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थिनींना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.




या यशासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींना सातत्याने मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या यशामागे शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शाळेचे सकारात्मक शैक्षणिक वातावरण महत्त्वाचे ठरले.

शाळेच्या यशामध्ये योगदान देणाऱ्या शिक्षकांमध्ये मुख्याध्यापिका सुनिता खोब्रागडे, प्रिया बोरकर, विनय खापर्डे, दत्तात्रय पुलेनवार, अनुराधा महाजन, राजरत्न गजभिये, पंकज काळे, कु. प्रतीक्षा घ्यार आणि ज्योत्स्ना नेऊलकर यांचा समावेश आहे.

यावेळी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना शिक्षकांनी स्वप्न मोठी ठेवा, मेहनत प्रामाणिक करा आणि यश तुमच्या पावलांशी येईल हा प्रेरणादायी संदेश दिला. शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अभिनय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन : नाट्य कलावंतांचा उत्साही प्रतिसाद

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, पनवेल :** महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ मे पासून १९ मे पर्यंत नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचे दिनांक ११ रोजी उद्घाटन होणार आहे. या उद्घाटनासाठी महापौर नितीन पाटील, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य तथा रंगकर्मी प्रथमेश सोमण, सन्माननीय महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर, सहा.आयुक्त डॉ. रूपाली माने तसेच प्रशिक्षक उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावर सायंकाळी ४:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात उत्तम कलावंत निर्माण व्हावेत यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर



कलावंतांसाठी पुर्णतः मोफत आहे.

यात शिक्षक- प्राध्यापक कलावंतांसाठी विशेष बॅचचे नियोजन कळंबोली येथे करण्यात आले आहे. तर पनवेल आणि खारघर येथे एक बॅच ही उच्चस्तरीय अभिनय प्रशिक्षणासाठी व एक बॅच प्राथमिक प्रशिक्षणाची आहे. गतवर्षी प्रशिक्षण घेतलेल्यांना वरिष्ठस्तरीय प्रशिक्षण मिळावे यासाठी अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

**प्रशिक्षण स्थळे :**

१) पनवेल - आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह

२) खारघर - सिंधुदुर्ग प्रभात समिती अ कार्यालय तिसरा मजला, सभागृह, सेक्टर १९ भूखंड १४ खारघर

३) कळंबोली - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, 24Q3+VC3 रोडपाली

**दोन गट :**

अभिनय प्रशिक्षण शिबीरासाठी प्रत्येक केंद्रावर दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. यात पहिला गट वय वर्षे ८ ते १६ तर दुसरा गट हा युवा व प्रौढांसाठी असून १७ ते ६५ वयांपर्यंत कलावंतांना यात सहभाग घेता येईल.

नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबीरात मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच शेवटी सर्व प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण होईल. सर्व शिबीरांर्थींना समारोपा दिवशी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# दु:खाचा डोंगर बाजूला सारून कर्तव्याला प्राधान्य !

## वडिलांचा अंत्यविधी आटोपून परीक्षा देणाऱ्या गायत्रीचे घवघवीत यश

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१०, पालम (परभणी) :** नशिबाने समोर वाढून ठेवलेलं आभाळएवढं दुःख आणि दुसरीकडे आयुष्याची दिशा ठरवणारी दहावीची परीक्षा अशा कठीण प्रसंगात डगमगून न जाता धैर्याने सामोरे गेलेल्या पालम तालुक्यातील फळा येथील गायत्री लक्ष्मण पौळ हिने दहावीच्या परीक्षेत ७४ टक्के गुण मिळवून देदीप्यमान यश संपादन केले आहे.

वडिलांच्या निधनानंतर अंत्यसंस्कार उरकून थेट परीक्षेला बसलेल्या गायत्रीच्या या यशाने संपूर्ण तालुक्यातून तिचे कौतुक होत आहे.

दहावीची परीक्षा सुरू असतानाच गायत्रीच्या वडिलांचे, लक्ष्मण पौळ यांचे निधन झाले. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. वडिलांच्या निधनाचे दुःख हृदयात दडवून, साश्रू नयनांनी तिने वडिलांचा अंत्यविधी आटोपला आणि ती थेट हिंदीचा पेपर देण्यासाठी परीक्षा केंद्रावर पोहोचली होती. त्यावेळी तिच्या या धाडसाची आणि कर्तव्याप्रती असलेल्या निष्ठेची चर्चा सर्वत्र झाली होती.

नुकताच दहावीचा निकाल



जाहीर झाला आणि गायत्रीने ७४ टक्के गुण मिळवत आपल्या मेहनतीचे चीज केले. प्रतिकूल परिस्थितीतही तिने दाखवलेली ही चिकाटी आणि संकटावर मात करण्याची ताकद अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

गायत्रीने मिळवलेल्या या यशानंतर पालम तालुक्यासह सोशल मीडियावर तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संकट कितीही मोठे असले तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यावर मात करता येते, हे गायत्रीने आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. वडिलांना दिलेली हीच खरी श्रद्धांजली असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा दहावी निकाल ९८.६३ टक्के ; उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.६३ टक्के लागला असून विद्यालयाने निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. फेब्रुवारी/मार्च २०२६ ला घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेचा निकाल आज ८ मे रोजी ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात आला. त्यामध्ये लोकमान्य टिळक कन्या विद्यालयाचा निकाल ९८.६३ टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून बोर्ड परीक्षेला एकूण २२० विद्यार्थीनी प्रविष्ठ झालेल्या होत्या. त्यापैकी २१७ विद्यार्थीनी परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. प्राविण्य श्रेणीत ४६, प्रथम श्रेणीत ८१, द्वितीय श्रेणीत ७० तर पास श्रेणीत २० अशा एकूण २२० विद्यार्थीनी उत्तीर्ण झालेल्या आहे.

विद्यालयातून प्रथम येण्याचा मान कु. तेजस्वी




किशोर राऊत हिला ९५ टक्के गुण मिळाले आहेत, द्वितीय स्थानी अंजली राजू उमाटे हिला ९१.८० टक्के तर तृतीय चेतना किशोर मेश्राम हिने ९१.४० टक्के गुण प्राप्त केले आहे. नेहा भागेश्वर चौधरी ९०.२० टक्के, श्रेया अतुल खाडीलकर ९०.२० टक्के, स्मृती सचिन दागमवार हिने ९० टक्के, तन्वी विनोद काकडे ८९ टक्के, सृष्टी सचिन दागमवार ८८.४० टक्के, तन्वी दीपक दारोकर ८७.४० टक्के, जान्हवी ज्ञानेश्वर भांदककर ८७.४० टक्के, अनुष्का रवींद्र कांबळे ८७.४० टक्के, मोहिनी गणेश दुरस्कर ८६.४० टक्के, सिध्दी देवानंद मोगरे ८६.४० टक्के, भूमिका धनराज बारसागडे ८६.२० टक्के, आसमा गौस्खॉ पठाण ८६.२० टक्के, प्राप्ती विकी दिकोंडवार ८५.४० टक्के तर स्वरा प्रवीण वऱ्हाटे हिने ८५ टक्के गुण प्राप्त करुन विद्यालयाचा नावलौकिक वाढविला.

सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक सोहळा मंडळाचे सचिव गांगेय सराफ यांचे अध्यक्षतेखाली शाळेत घेण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी, यशस्वी विद्यार्थीनी, त्यांचे पालक, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उत्तीर्ण विद्यार्थिनींचे मान्यवरांनी गुलाबपुष्प व फोल्डर फॅाईल देऊन त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. याप्रसंगी मंडळाचे सचिव गांगेय सराफ सर यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका दुर्गपुरोहीत मॅडम नी मार्गदर्शन करुन यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक केले. संचालन पेटकर सर यांनी तर आभार पर्यवेक्षिका महादाणी मॅडम नी केले.

# पत्रकार राहुल शिंदे यांना मातृशोक !!

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१०, कोल्हापूर :** दैनिक अक्षराज चे कोल्हापूर जिल्हा प्रतिनिधी राहुल शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती वासंतीबाई शिवदास शिंदे यांचे शनिवार, दि.०९ मे २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

मृत्यू समयी त्यांचे वय ७४ वर्ष होते. त्यांच्या पश्चात मुलगा राहुल शिंदे, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

रक्षाविसर्जन विधी सोमवार, दि.११ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आंबा रोड स्मशानभूमीत असून फोटो पूजन व उत्तरकार्य विधी वाठार नाका कॉर्नर, माळी गल्ली, वडगाव, जिल्हा कोल्हापूर येथील राहते घरी आहे.

दैनिक अक्षराज परिवारातर्फे पत्रकार राहुल शिंदे यांच्या माताश्री श्रीमती वासंतीबाई शिवदास शिंदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# नेरी-शिरपूर मार्गावर भीषण अपघात; दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू

**अक्षराज : नितेश पाटील**



**दि.१०, चिमूर (चंद्रपूर) :** नेरी-शिरपूर रोडवर झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मृतकाचे नाव अर्जुन अंबादास शिंदे (वय ४०, रा. पिंपळशेंडा, जि. यवतमाळ) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, MH 36 AL 5074 क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने MH 29 CK 0137 क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की दुचाकीच्या समोरील भागाचा पूर्णपणे चकनाचूर झाला.

अपघातानंतर गंभीर जखमी झालेल्या अर्जुन शिंदे यांना तातडीने चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मल्हारी ताळीकोटे करीत आहेत.

# विसापूरच्या विद्यार्थ्यांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

## दहावीची परीक्षा केली होती उत्तीर्ण



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, विसापूर (चंद्रपूर) :** लहानपणी वडिलांचे छत्र हरवले. आईने पुनर्विवाह केला. तो आजोबा कडे राहून शिक्षण घेत होता. शिक्षण घेत असताना सुट्टीत कामाला जात होता. नुकत्याच लागलेल्या दहावीच्या निकालात तो ५६ टक्के गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाला. भावी आयुष्याची स्वप्न पाहत होता. आंघोळ केल्यावर अंतर्वस्त्र वाळू घालत असताना त्याला विजेचा जबर धक्का बसला. यातच त्याचा मृत्यू झाला. ही घटना बल्लारपूर तालुक्यात विसापूर येथे आज रविवारी सकाळी ८ वाजता दरम्यान घडली. आयुष विशाल लाडे (१६) असे मृतक विद्यार्थ्यांचे नाव आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.विसापूर येथील निलकंठ वाघमारे या आजोबांकडे आयुष लहानपणापासून राहत होता. येथून त्याने शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यास घेतला होता. सुट्टीच्या दिवसात मात्र मिळेल, ते काम करून शिक्षणाचे ध्येय बाळगले होते. आई वडिलांपासून पोरका झालेला आयुषला मात्र आजोबाचा आधार होता. त्याने दहावीची परीक्षा दिली होती. आपण चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन भावी आयुष्यात काही तरी करावे, म्हणून धडपड करत होता.

आज सकाळी लवकर उठून आंघोळ करून कटरच्या कामाला जाण्याची तयारी करत होता. त्याने अंतर्वस्त्र घरी लावलेल्या तारेवर वाळत घालताना विजेचा प्रवाह त्यात आहे. हे त्याला समजले नाही. येथेच आयुष च्या आयुष्याची दोरी तुटली. एका होतकरू विद्यार्थ्यांचा अकाली मृत्यू झाला.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी पॉश ॲक्टची कडक अंमलबजावणी करणे अनिवार्य

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, मुंबई :** कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास आळा घालण्यासाठी पॉश कायद्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे आणि तिची नोंद केंद्र शासनाच्या शी-बॉक्स पोर्टलवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखावर ५० हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असून, पुनरावृत्ती झाल्यास दुप्पट दंड अथवा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाचे आयुक्त जगदिश मिनियार यांनी दिली आहे. नाशिक येथील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर हे निर्देश जारी करण्यात आले असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील काही खाजगी आस्थापनांमध्ये समित्या स्थापन झाल्या असून, आस्थापनांनी तातडीने समित्या स्थापन कराव्यात अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच शी-बॉक्स पोर्टलवर नोंदणी तातडीने करण्यात यावी, असे पत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. पॉश ॲक्ट कायद्याअंतर्गत प्रत्येक समितीमध्ये वरिष्ठ महिला अध्यक्ष, किमान दोन कर्मचारी सदस्य आणि स्वयंसेवी संस्थेतील एक सदस्य असणे आवश्यक असून समितीतील किमान ५० टक्के सदस्य महिला असणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र आस्थापनांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन झाल्या आहेत का, त्यांची रचना कायद्यानुसार आहे का, तसेच शी-बॉक्स पोर्टलवर नोंदणी झाली आहे का, याची खात्री करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि विविध विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांच्या देण्यात आले आहेत.